**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,**

राज्य विधानमंडळाच्या २०१५ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनामध्ये आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे.

२. माझ्या शासनाने, आपली सुरूवात अत्यंत उत्साहाने, जोमाने केली असून राज्याच्या प्रगतीसाठी व विकासासाठी शासनाने सर्वसमावेशक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यावर विशेष जोर दिला आहे. समाजाच्या सर्वच स्तरातील लोकांच्या कल्याणासाठी व खासकरून तळागाळातील तसेच असुरक्षित गटातील लोकांच्या कल्याणासाठी कामे करून त्यांचा विकास साधणे हे शासनाचे ध्येय आहे. त्याकरिता सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात राज्याला योग्य दिशा दिली जाईल याची शासन सुनिश्चिती करील.

३. नोव्हेंबर व डिसेंबर २०१४ मधील अवकाळी पाऊस व गारपीट यांमुळे राज्याच्या काही भागांमधील पिके व शेतजमिनींचे नुकसान झाले. त्याकरिता शासनाने बाधित शेतकऱ्यांना तातडीने विशेष आर्थिक सहाय्य व सवलत देण्याचा आणि जीवित हानी, जनावरे व पडझड झालेली घरे यांसाठी नुकसानभरपाई देण्याचा निर्णय घेतला. हे पॅकेज राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या मानकांपेक्षा खूपच जास्त आहे.

४. राज्यातील ज्या गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी होती अशा २३८११ गावांमध्ये टंचाईसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली असून स्थायी आदेशांनुसार या क्षेत्रांमध्ये विविध सहाय्याच्या उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड, थकित पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर व शेतीशी निगडित कर्ज वसुलीस स्थगिती यांचा समावेश आहे. यासंदर्भात वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी भारत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून त्यांच्या मदतीची वाट न बघता, माझ्या शासनाने बाधित शेतकऱ्यांना ४००० कोटी रूपये इतकी रक्कम थेट लाभ हस्तांतरण योजनेमार्फत वितरित केली आहे.

५. सततच्या दुष्काळाचा प्रतिकूल परिणाम विचारात घेता, शासनाने "जलयुक्त शिवार अभियान" नावाचा एक नवीन कार्यक्रम घोषित केला आहे. राज्याला २०१९ पर्यंत दुष्काळमुक्त करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणे आणि गावाच्या हद्दीतील पावसाच्या पाण्याचा जलसंचय करून त्याद्वारे भूजल पातळीत वाढ करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. या अभियानाद्वारे पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सूक्ष्म जलसिंचन पद्धतीस चालना देण्यात येईल व त्यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होईल. प्रत्येक वर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठरविले आहे.

६. माझे शासन, राज्याच्या जलसंपदेचा इष्टतम, समन्यायी व शाश्वत रीतीने विनियोग करण्यासाठी अद्ययावत तंत्रांचा वापर करण्यावर भर देईल आणि जलसिंचन सुविधा पुरवून शेतकऱ्यांना आधार देईल. शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, जुन्या प्रकल्पांचे नवीकरण, भूपृष्ठ जल व भूजल याचा संयुक्त वापर इत्यादींसारखी पावले उचलण्यात येतील. जलसिंचन व्यवस्थापनातील शेतकऱ्यांचा सहभाग व सूक्ष्म जलसिंचनाचा वापर यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल.

७. पाण्याची मागणी व सिंचनेतर पाणी वापरकर्त्यांना शासनाची मंजुरी देणे यासाठी ऑनलाईन सुविधा देण्याचा शासनाचा मानस आहे. प्रगत तंत्रज्ञानाच्या वापरास उत्तेजन देण्यासाठी तंत्रज्ञान मान्यता अभिकरण स्थापन करण्यात येईल.

८. "स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत" २०१५-१६ या वर्षामध्ये ग्रामीण भागांत सुमारे १४.१५ लाख इतकी प्रसाधनगृहे बांधण्यात येतील. तसेच नागरी भागांतील सुमारे ८ लाख कुटुंबांना प्रसाधनगृह सुविधा पुरविण्याचे शासनाने ठरविले आहे.

९. पाणी व स्वच्छता आणि इतर आनुषंगिक सेवा पुरविण्याकरिता जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये "जलस्वराज्य-दोन" हा कार्यक्रम सुरू करण्याचे ठरविले आहे.

१०. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पुढील दोन वर्षांत ४४,००० विहिरींची कामे आणि रोजगार हमी योजनेतून पांदण रस्ते व शेतरस्ते यांच्याशी संबंधित जास्तीत जास्त कामे करण्यात येतील.

११. राज्यात १ एप्रिल २०१५ पासून राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत ऑनलाईन ई-फेरफार कार्यक्रमाची अंमलबजावणी होणार असून त्यामुळे सर्व भूमी अभिलेख तलाठ्यांच्या लॅपटॉपवर २ ऑक्टोबर २०१५ पासून उपलब्ध होतील.

१२. दुष्काळाची अभूतपूर्व स्थिती आणि दुष्काळाची तीव्रता कमी करण्याची गरज लक्षात घेता माझ्या शासनाने महात्मा फुले जल अभियानामार्फत फळबागांचे पुनरूज्जीवन, वैरण विकास कार्यक्रम आणि सूक्ष्म जलसिंचन यांसाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत ३५० कोटी रूपये इतकी तरतूद केली आहे. यावर्षी कोरडवाहू शेती अभियान प्रभावीपणे पुढे सुरू ठेवण्यात येईल.

१३. माझ्या शासनाने नाबार्डकडून ग्रामीण पायाभूत सोयीसुविधा विकास निधी अंतर्गत ४५० कोटी रूपये इतके कर्ज घेण्याचा एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ५ लाख शेतकऱ्यांच्या अर्थसहाय्यासाठीच्या सर्व प्रलंबित मागण्या पुढील वित्तीय वर्षापर्यंत पूर्ण करण्यात येतील.

१४. राज्यात पीक विमा योजनेअंतर्गत २०१४-१५ मध्ये जवळपास २० लाख शेतकऱ्यांचा विक्रमी सहभाग दिसून आला आहे. आतापर्यंत १५ लाख इतक्या शेतकऱ्यांना ३८४ कोटी रूपये इतकी नुकसानभरपाईची रक्कम प्रदान केली असून या योजनेची व्याप्ती तसेच तिची उपयोगिता पुढील वर्षी आणखी वाढवण्यात येईल.

१५. एकात्मीकृत कृषि विकासासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारीअन्वये मूल्य साखळीचे प्रचालन करण्यासाठी, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने राज्याला जागतिक स्तरावर मान्यता दिली आहे. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्यासाठी ५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांचा कॉर्पोरेट जगताशी संपर्क साधून देणे राज्याला शक्य झाले असून पुढील तीन वर्षांमध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांना सामावून घेण्यासाठी या कार्यक्रमाचा विस्तार करण्यात येईल.

१६. मराठी भाषा धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासन कटिबद्ध असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी भारत सरकारकडे नेटाने पाठपुरावा करीत आहे. तसेच शासन मराठी भाषा भवन बांधण्याकरिता प्रयत्नदेखील करीत आहे.

१७. अधिक दक्षतेमुळे, पेंच व ताडोबा व्याघ्र प्रकल्पांमधील वाघांच्या संख्येत लक्षणीयरीत्या वाढ झाली आहे. त्याच धर्तीवर मेळघाट व नवेगाव - नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये विशेष व्याघ्र संरक्षण दल निर्माण करण्याचे योजिले आहे.

१८. मानव व वन्य प्राणी यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी व्याघ्र प्रकल्प व वन्यजीव अभयारण्यामध्ये स्थित असलेल्या ७ गावांमधील सुमारे ६५० कुटुंबियांचे

२०१४-१५ या वर्षामध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. हा संघर्ष आणखी कमी करण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरण व्यवस्थापन उपाययोजना हाती घेण्यात येतील. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात व्यक्ती मृत्युमुखी पडल्यास त्याकरिता दिल्या जाणाऱ्या वित्तीय सहाय्याच्या रकमेत १५ जानेवारी २०१५ पासून ५ लाख रूपयांवरुन ८ लाख रूपये इतकी वाढ करण्यात आली आहे.

१९. माझ्या शासनाने, चिचपल्ली, जिल्हा चंद्रपूर येथे बांबू प्रशिक्षण व संशोधन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

२०. पूर्वीच्या लक्ष्यित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजनेच्या सर्व लाभार्थींना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अन्वये अंत्योदय अन्न योजनेचे पात्र लाभार्थी म्हणून समजण्यात येईल आणि पूर्वीच्या लक्ष्यित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील दारिद्र्य रेषेखालील सर्व लाभार्थींना या अधिनियमाअन्वये प्राधान्य कुटुंब गटामधील पात्र लाभार्थी म्हणून समजण्यात येईल.

२१. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधीमधून प्राप्त झालेल्या अर्थसहाय्यातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यात ५.९५ लाख मेट्रिक टन क्षमतेची गोदामे बांधण्याचे ठरविण्यात आले असून त्यापैकी ६० हजार मेट्रिक टन क्षमतेच्या ६५ गोदामांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

२२. पथदर्शी प्रकल्पाद्वारे राबविलेल्या पारदर्शी व स्पर्धात्मक ई-लिलाव पद्धतीतून साखरेची खरेदी यशस्वीरीत्या केल्यानंतर, शासनाने राज्यातील साखर खरेदीची व वितरणाची ही पद्धत यापुढेही चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

२३. वर्धा व अमरावती जिल्ह्यांमध्ये एलपीजीसाठी सुरू केलेली सुधारित थेट लाभ हस्तांतरण योजना आता राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील अंमलात आली आहे.

२४. लाभार्थींना रास्त भाव दुकानांमधून अन्नधान्ये व इतर वस्तूंचे वितरण बायोमेट्रिक पद्धतीने ओळख पटवून करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२५. ग्राहकांच्या सोयीसाठी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, आपले सध्याचे मुंबई येथील मुख्य न्यायपीठ आणि नागपूर व औरंगाबाद येथील परिक्रमा न्यायपीठांबरोबरच कोल्हापूर, पुणे, नाशिक आणि अमरावती येथेही त्याची कार्ये पार पाडील, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

२६. गोदामांमध्ये कृषिमाल साठवणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या मालाची ई-वखारपावती देण्यात येत आहे. आतापर्यंत १४,२०० शेतकऱ्यांना २४,४६० वखारपावत्यांच्या आधारे १०२ कोटी रुपये इतक्या रकमेचे तारण कर्ज उपलब्ध करून दिले आहे.

२७. शेतकऱ्यांच्या मालास बाजारभाव मिळावा याकरिता नाशवंत पदार्थांसाठी शीतगृहे उभारण्यात येत असून त्याचवेळी राज्यातील बंद असलेले ४४ कृषि प्रकल्प प्रगतीशील शेतकऱ्यांना देऊन ते चांगल्या पद्धतीने चालवले जाणार आहेत.

२८. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत पालेभाज्या व फळे पिकविण्याकरिता उभारण्यात आलेली ४४ निर्यात सुविधा केंद्रे आता विविध सहकारी संस्था, बाजार समिती यांना भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच हापूस आंब्यावरील कीड ओळखण्यासाठी वाशी मार्केट येथे एक प्रकल्प उभारण्यात आला असून त्या प्रकल्पास युरोपच्या शिष्टमंडळाने भेट देऊन अनुकूलता दर्शविली आहे. त्यामुळे हापूस आंब्याच्या निर्यातीमधील अडचणी दूर होतील.

२९. गायी, बैल व वळूंच्या कत्तलीवर बंदी घालण्याकरिता आणि कत्तलीसाठी त्यांची वाहतूक, खरेदी-विक्री, निर्यात यांस प्रतिबंध करणारे महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) विधेयक, १९९५ राज्य विधानमंडळाने संमत केले आहे. प्रस्तुत विधेयकास मा. राष्ट्रपती महोदयांनी नुकतीच संमती दिली असून त्यासंबंधीचा कायदा अंमलात आला आहे.

३०. राज्य शासनाने नाबार्ड टप्पा-१६ च्या सहाय्याने मासे उतरवणी केंद्रांच्या विकासासाठी, एकूण १०२.३७ कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चाच्या २० प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिली असून त्यापैकी १६ प्रकल्पांचे काम सुरू आहे.

३१. माझे शासन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक बांधण्यासाठी इंदू मिल क्रमांक ६ येथील जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी भारत सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

३२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९२१-२२ मध्ये वास्तव्य केलेले लंडन येथील घर खरेदी करण्यासाठी शासनाने तत्वत: मान्यता दिली असून या प्रयोजनार्थ, भारत सरकार व भारतीय रिझर्व्ह बँक यांची मान्यता मिळविण्याची प्रक्रिया

सुरू करण्यात आली आहे. सदर वास्तू आंतरराष्ट्रीय स्मारक म्हणून जतन करण्याचे शासनाने ठरविले आहे.

३३. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे औरंगाबाद येथे भव्य स्मारक उभारण्याचे योजिले आहे.

३४. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी शासन बांधील आहे. शासनाच्या सर्वसमावेशक पुनर्वसन धोरणामुळे, भूमी संपादन करण्याकरिता बहुतांश प्रकल्पबाधित व्यक्तींची संमतीपत्रे सिडकोला प्राप्त झाली आहेत. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या बहुतांश परवानग्या मिळालेल्या आहेत. सदर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सभोवताली ६०० चौ. कि. मी. च्या क्षेत्रात "नयना" नावाने ओळखले जाणारे एक नवीन अत्याधुनिक शहर उभारण्याचे ठरविले आहे.

३५. भारत सरकारने घोषित केलेल्या स्मार्ट सिटी अभियानानुसार राज्यामध्ये जास्तीत जास्त अत्याधुनिक शहरे विकसित करण्याचा राज्य शासनाचा मानस असून या अत्याधुनिक शहरांमध्ये शिक्षण, वैद्यकीय, मनोरंजन, उद्योग इत्यादींसारख्या विविध क्षेत्रांतील संकल्पनांवर भर असणाऱ्या ३० शहरांचा समावेश असेल. यासंदर्भात, मार्गदर्शक आराखडा सुचविण्यासाठी अभ्यास गट तयार करण्यात आले आहेत.

३६. राज्याच्या ग्रामीण भागांमधील अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे यासाठी विवक्षित शर्तींना अधीन राहून अशा अनधिकृत बांधकामांना प्रशमित करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. त्याकरिता, नागपूर येथील मागील हिवाळी अधिवेशनात संबंधित अधिनियमात आवश्यक त्या सुधारणांना मान्यता दिली आहे. नागरी भागांमधील समस्यांचे निराकरण करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटित केली आहे.

**३७. "मेक इन महाराष्ट्र" अभियानाअंतर्गत राज्यातील औद्योगिक विकासाला चालना व प्रोत्साहन देणे आणि औद्यौगिक वसाहती स्थापन करण्याची प्रक्रिया सुलभ करणे यासाठी प्रादेशिक योजना क्षेत्रांमधील कृषि आणि ना-विकास क्षेत्रांचा औद्योगिक वापर करण्याकरिता सध्याच्या परवानगीयोग्य असलेल्या तलपृष्ठ निर्देशांकात वाढ करण्याचे शासनाने तत्वतः ठरविले आहे.**

३८. विकास कामांना परवानगी देण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने, सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती व प्रादेशिक योजना क्षेत्रांसाठी प्रमाणित विकास नियंत्रण विनियम लागू केले आहेत. त्यामुळे विहित नमुन्यात अर्ज करणाऱ्या अर्जदारांना ७ दिवसांच्या आत परवानगी देणे शक्य झाले आहे.

३९. नागरी क्षेत्रातील गरिबांचा कौशल्य विकास व सक्षमता यावर लक्ष केंद्रित करून त्याद्वारे नागरी क्षेत्रातील गरिबी कमी करण्यासाठी ५३ शहरांमध्ये राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व उर्वरित नागरी स्थानिक संस्थांमध्ये राज्य नागरी उपजीविका अभियान शासन राबवित आहे.

४०. माझ्या शासनाने म्हाडामार्फत परवडणाऱ्या घरांचे मोठ्या प्रमाणात बांधकाम करण्यासाठी जमिनी संपादित करण्याचे ठरविले असून म्हाडाने यापूर्वी संपादित केलेली जमीन फक्त घरांच्या बांधकामासाठी राखून ठेवण्यात येईल असेही ठरविले आहे.

४१. धर्मादाय संस्था आणि इतर खाजगी जमीन मालक यांच्या मालकीच्या झोपडपट्टी अतिक्रमित जमिनींवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना कार्यान्वित करण्यासाठी जर अशा जमीन मालकांनी विनिर्दिष्ट वेळेच्या आत योजना तयार केल्या नाहीत तर, शासनाने अशा जमिनी संपादित करण्याचे ठरविले आहे. मुंबई शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जीआयएस प्रणालीमार्फत नकाशेदेखील तयार करण्यात येतील.

४२. राज्याला औद्योगिक, पर्यटन व सेवा क्षेत्रात आघाडीवर नेणे व रोजगाराच्या संधी वाढविणे यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते, महामार्ग व द्रुतगती मार्ग यांची निर्मिती व आधुनिकीकरण यासाठी कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्यामध्ये पुणे शहराच्या सभोवताली रिंग रोड तसेच निवडक क्षेत्रांवर स्मार्ट सिटीची निर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच राज्यातील इतर प्रकल्पांची कामे हाती घेण्यासाठी एमएसआरडीसी इंडिया इंटरनॅशनल अशी शासकीय कंपनी स्थापन करण्याचे योजिले आहे.

४३. शासनाने सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन करण्याच्या संबंधातील विविध कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून त्यामध्ये स्नानासाठी घाट, क्षेत्रविकासाची कामे इत्यादींचा समावेश आहे.

४४. वाहतुकीच्या समस्या सोडविण्यासाठी व रस्त्यांवरील वाढते अपघात कमी करण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा करण्याकरिता ब्ल्यूमबर्ग फिलॅथ्रॉपीज, अमेरिका यांच्यासमवेत शासनाने सामंजस्य करार केला असून त्यांच्या सहकार्याने यापुढे वाहतुकीच्या समस्या सोडविण्यात येतील.

४५. मेरू व अन्य खाजगी टॅक्सींमध्ये जीपीआरएस यंत्रणा बसविण्याचे आणि मुंबईतील शेअर टॅक्सींमध्ये महिलांसाठी पुढील आसन आरक्षित ठेवण्याचे प्रस्तावित केले आहे.

४६. राज्याच्या प्रमुख शहरांमध्ये, अधिक चांगल्या सुरक्षिततेच्या वातावरणासाठी सीसीटीव्हीवर आधारित संनिरीक्षण यंत्रणा बसविण्याच्या उपक्रमाचा भाग म्हणून, मुंबईमध्ये ही यंत्रणा बसविण्याच्या कामास सुरुवात झाली असून हा प्रकल्प ९० आठवड्यांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. पुण्यामध्ये हा प्रकल्प यापूर्वीच राबविण्यात येत आहे.

४७. राज्यात अपराध सिध्द होण्याचे प्रमाण खूपच कमी आहे याची शासनाला जाणीव आहे. गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी शासन अनेक उपाययोजना करीत आहे.

४८. राज्यात, महाराष्ट्र ठेवीदार (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियमान्वये अनेक गुन्ह्यांची नोंद केली जात आहे. त्याअंतर्गत उचित कार्यवाही करून बहुराष्ट्रीय वित्तीय सल्लागार कंपन्यांच्या मदतीने ठेवीदारांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई करून देण्यात येईल.

४९. प्रत्येक महानगरपालिकेच्या क्षेत्रात पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याच्या उद्देशाने अकोला येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

५०. माझे शासन प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकालात काढण्यासाठी, पायाभूत सुविधा पुरवून आणि ई-प्रशासनास प्रोत्साहन देऊन त्याद्वारे न्यायदानामध्ये सुधारणा करण्यास कटिबद्ध आहे. शासनाने, धर्मादाय आयुक्तांची आणि निबंधक, भागीदारी संस्थांची कार्यालये वगळता, दुय्यम न्यायालयांच्या संगणकीकरणासदेखील चालना दिली आहे. अलिकडेच, ई-न्यायालय (कागदविरहीत न्यायालय) कार्यान्वित करण्यात आले असून आणखी ई-न्यायालये सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

५१. शासनाने, महिला व बालकांच्या लैंगिक अत्याचाराशी संबंधित प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी विशेष न्यायालये आणि जलदगती न्यायालये स्थापन करण्याचे ठरविले आहे.

५२. माझे शासन २७ ऑगस्ट २०१४ पासून अंमलात असलेल्या राज्य विवाद धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास बांधील आहे. त्यामुळे न्यायालयातील प्रकरणे प्रलंबित राहण्याचा कालावधी कमी होण्यास आणि पैशांची व वेळेची बचत होण्यास मदत होईल.

५३. राज्य शासनाने घटित केलेल्या समतोल प्रादेशिक विकासासंदर्भात उच्चस्तरीय समितीने दिलेला अहवाल विचारात घेऊन, मंत्री समिती घटित करण्यात आली असून ती समिती मंत्रिमंडळाला शिफारशी सादर करील.

५४. आर्थिक लाभापासून वंचित राहिलेल्या देशातील जनतेचे सर्वंकष विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या "प्रधानमंत्री जनधन योजने अंतर्गत", राज्यातील ग्रामीण भागात ३७.५० लाख आणि शहरी भागात ३९.२६ लाख अशी एकूण ७६.७६ लाख खाती उघडण्यात आली आहेत.

५५. राजमाता जिजाऊ यांच्या सिंदखेड राजा, बुलढाणा या जन्मगावी त्यांचे स्मारक उभारण्यासाठीच्या विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे.

५६. माझ्या शासनाने २६ जानेवारी २०१५ रोजी "आपले सरकार" हे मोबाईल ॲप्लिकेशन व पोर्टल सुरू केले आहे. या माध्यमातून नागरिकांना आश्वासित मुदतीत आपल्या तक्रारींचे निवारण करणे, प्रशासनासंबंधित त्यांच्या सूचना व अभिप्राय कळविणे आणि कोणतीही योजना किंवा कार्यक्रमाविषयीची अपेक्षित माहितीदेखील मिळविणे शक्य होईल.

५७. शासनाने माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाच्या मदतीने विविध नागरी सेवा पुरविण्यासाठी "डिजीटल इंडिया" या कार्यक्रमांतर्गत अनेक प्रकल्प सुरू केले आहेत. यांपैकी काही प्रकल्पांमध्ये, वाहतूक पोलिसांकरिता ई-चलन, डिजीटल लॉकर, ऑनलाईन माहितीचा अधिकार, मंत्रालयामध्ये अभ्यागत प्रवेश व्यवस्थापन पद्धत आणि शासकीय सेवेतील भरतीसाठी ऑनलाईन अर्ज यांचा समावेश आहे.

५८.  शासनाची प्रापण प्रक्रिया अधिकाधिक कार्यक्षम व पारदर्शी करण्यासाठी ३ लाखांपेक्षा अधिक रकमेच्या सर्व निविदांसाठी ई-निविदा सक्तीची करण्यात आली आहे.

५९.  राज्यामध्ये नवीन वस्तुनिर्मिती उद्योगांच्या स्थापनेस चालना देण्यासाठी "मेक इन महाराष्ट्र" ही मोहीम माझ्या शासनाने सुरू केली आहे. इलेक्ट्रॉनिक क्लिअरन्स यंत्रणेच्या सहाय्याने या उद्योगांना मान्यता मिळविण्यासाठी लागणारा वेळ कमी करण्याकरिता पद्धतशीर सुधारणा करण्यात येतील.

६०.  मुंबईमध्ये गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यासाठी व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अद्ययावत "एकात्मिक सोयीसुविधा केंद्र" स्थापन करण्यात आले आहे.

६१.  राज्य शासनाचे विद्यमान खरेदी धोरण कालबाह्य झाले असल्यामुळे राज्यासाठी नवीन खरेदी धोरण तयार करण्यात येत असून पारदर्शक व खात्रीशीर खरेदी प्रक्रियेसाठी, सर्व शासकीय कार्यालयांना ई-निविदा धोरण अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच राज्यातील इलेक्ट्रॉनिक उद्योग आणि माहिती व तंत्रज्ञान उद्योग यांना प्रोत्साहन देण्यासाठी नवीन माहिती तंत्रज्ञान धोरण तयार करण्यात येईल.

६२.  माझ्या शासनाची सर्व राजपत्रे १ फेब्रुवारी २०१५ पासून शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने संचालनालय, मुंबई यांच्या संकेतस्थळावर ई-राजपत्राच्या स्वरूपात उपलब्ध करून दिली जात आहेत.

६३.  महाराष्ट्र राज्यामध्ये दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत दोन नोड उभारण्याकरिता भारत सरकारच्या दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर ट्रस्ट सोबत राज्य शासनाने स्टेट सपोर्ट करारावर व शेअर होल्डर करारावर स्वाक्षरी केली आहे. औरंगाबाद येथे पहिल्या दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर नोडची अंमलबजावणी करण्यासाठी औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड ही विशेष हेतू कंपनी घटित करण्यात आली आहे.

६४.  बदलत्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रोजगार बाजारपेठेमधील कुशल व गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची प्रचंड मागणी पूर्ण करण्यासाठी, भारत सरकारने बेरोजगारांच्या कौशल्य विकासाला राष्ट्रीय पातळीवर प्राधान्य दिले आहे. त्याचे महत्त्व ओळखून,

माझ्या शासनाने, ही समस्या सोडविण्यासाठी एक स्वतंत्र कौशल्य विकास व उद्योजकता विभाग स्थापन केला आहे.

६५. भारत सरकारच्या " डिजीटल इंडिया " या उपक्रमाच्या धर्तीवर, कौशल्य व उद्योजकता विकास परिसंस्थेला एक कार्यक्षम डिजीटल व्यासपीठ मिळवून देण्यासाठी " महाकौशल्य.जीओव्ही.इन " पोर्टल सुरू करण्याचा माझ्या शासनाचा मानस आहे. या उपक्रमांची व्याप्ती वाढवण्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकास यांच्याशी संबंधित " कॉल सेंटर्स " चा आणखी विस्तार करण्यात येईल.

६६. राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्रास चालना देण्यासाठी भारत सरकारच्या सहाय्याने एकात्मिक वस्त्रोद्योग प्रक्रिया योजनेअंतर्गत वस्त्रोद्योग प्रक्रिया पार्कसाठी अनुदान मंजूर करण्याचा तसेच नांदगाव पेठ, अमरावती येथे १२०० एकर जमिनीवर टेक्सटाईल हब उभारण्याचादेखील निर्णय शासनाने घेतला आहे. यासाठी २००० कोटी रूपये इतकी गुंतवणूक अपेक्षित आहे व या प्रकल्पामुळे सुमारे ७५०० व्यक्तींना रोजगार उपलब्ध होईल.

६७. विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महाजेनको विविध वीज प्रकल्पांची अंमलबजावणी करीत असून मार्च, २०१६ पर्यंत तिच्या स्थापित वीज क्षमतेमध्ये ३२३० मेगावॅट इतकी वाढ होईल. शिर्सुफळ, पुणे येथील महाजेनकोच्या ५० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पातून २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी वीज निर्मिती सुरू करण्यात आली असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाजेनकोची एकूण सौर ऊर्जेची क्षमता १८० मेगावॅट इतकी होईल.

६८. कोराडी औष्णिक ऊर्जा केंद्राला ऊर्जा निर्मिती प्रक्रियेकरिता प्रतिदिन १३० दशलक्ष लीटर पाण्याची आवश्यकता आहे. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानाअंतर्गत सुरू केलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या भांडेवाडी येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करून, या पाण्याची गरज भागविण्यात येणार आहे. हा प्रकल्प मे, २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

६९. कृषि उपभोक्त्यांच्या थकबाकीचा भार कमी करण्यासाठी " कृषि संजीवनी योजना २०१४ " कार्यान्वित केली असून ही योजना पुढे ३१ मार्च २०१५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. आतापर्यंत या योजनेचा लाभ ५.४२ लाख उपभोक्त्यांनी घेतला आहे.

७०. दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने, अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांना चालना देण्याची अत्यंत गरज आहे. त्याकरिता राज्यामध्ये नवीकरणीय वीज प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेमध्ये भरीव वाढ करण्यासाठी एक नवीन व सर्वसमावेशक धोरण तयार करण्यात येत आहे.

७१. शासनाने असंघटित क्षेत्रातील ऊसतोड कामगारांना, आर्थिक सुरक्षा पुरविण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी, महाराष्ट्र माथाडी,हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अन्वये ऊसतोड कामगारांसाठी मंडळ घटित करण्याचे ठरविले असून त्या मंडळाचे नाव " लोकनेते गोपीनाथ मुंडे महाराष्ट्र ऊसतोड व वाहतूक आणि इतर असंरक्षित श्रमजीवी कामगार मंडळ " असे राहील.

७२. असंघटित क्षेत्रांतील कामगारांच्या कल्याणाची सुनिश्चिती करण्यासाठी राज्य शासन, एक नवीन व स्वतंत्र धोरण तयार करीत असून त्याकरिता संबंधित अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत.

७३. शासनाने, महाराष्ट्रातील राज्य नागरी सेवेतील अधिकाऱ्यांकरिता पुढील निर्धारण वर्षापासून कार्य मूल्यमापन अहवाल पद्धत ऑनलाईन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

७४. शासनाने अनुकंपा तत्त्वावरील गट 'क' व 'ड' मधील पदांवर नियुक्ती करण्यासाठीचा वाटा ५ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत वाढविला आहे.

७५. शासकीय कर्मचाऱ्यांचा सक्षमता स्तर वाढविण्यासाठी एक नवीन प्रशिक्षण धोरण लागू करण्यात आले आहे. सर्व ३६ जिल्ह्यांमधील प्रशिक्षण संस्थांना जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण केंद्रे म्हणून घोषित करण्यात आले असून त्याद्वारे राज्यातील गट 'क' व 'ड' मधील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल.

७६. बेलोरा, अमरावती येथे भारतीय विमानतळ प्राधिकरणामार्फत विमानतळ विकसित करण्याचा आणि ओझर विमानतळ, नाशिक येथील टर्मिनल इमारत हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड यांना दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यावर हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, शिर्डी, अहमदनगर येथे विकसित करण्यात येत असलेल्या नवीन विमानतळाच्या पहिल्या टप्प्यातील काम जवळपास पूर्णत्वास आले

असून  या वर्षी सदर विमानतळावरून साई भक्तांसाठी नॉन-शेड्यूल्ड फ्लाईट्स सुरू करण्यात  येतील.

७७. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाबाबत माझे शासन अत्यंत गंभीर व संवेदनशील असून या प्रश्नावर प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणाचा सक्रिय पाठपुरावा करून त्याद्वारे वादग्रस्त सीमा भागातील मराठी भाषिक जनतेच्या पाठीशी सदैव उभे राहील.

७८. असंघटित कामगार सुरक्षा अधिनियम, २००८ च्या तरतुदींअन्वये, केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार असंघटित कामगारांसाठी विद्यमान राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेशी संलग्न अशी एक नवीन " राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना " सुरू करण्यात येत आहे.

७९. राज्यातील मेळघाट, धडगाव, मोखाडा यांसारख्या दुर्गम भागातील दुर्धर आजार असलेल्या रूग्णांना टेलिमेडिसीनद्वारे नागरी क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत सेकंड ओपिनियन देण्याकरिता " शिव आरोग्य योजना " सुरू करण्याचे शासनाने योजिले आहे.

८०. मातामृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याकरिता मेळघाट येथे सुरू करण्यात आलेली " माता व बाल ट्रॅकिंग सुविधा " राज्यातील इतर दुर्गम भागातदेखील राबविण्यात येणार आहे.

८१. रूग्णांना सुरक्षित व सुरळीत रक्त पुरवठा होण्याकरिता राज्यात लवकरच न्यूक्लिक ॲसिड टेस्टींग केंद्रे सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. संसर्गजन्य रोगांच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी तसेच सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास मनाई करण्यासाठी कायदा करण्यात येईल त्यामुळे स्वास्थ्य व स्वच्छतादेखील राखता येईल.

८२. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अकोला येथे प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत एक अतिविशेषोपचार रूग्णालय सुरू करण्याचा तसेच कर्करोग उपचार योजनेअंतर्गत एक दर्जेदार कर्करोग देखभाल केंद्र स्थापन करण्याचा शासनाचा मानस आहे.

८३. भारतीय वैद्यकीय परिषदेच्या मानकांनुसार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अकोला येथे भारतीय वैद्यकीय परिषदेने मंजुरी दिलेल्या वाढीव ५०

एमबीबीएस जागांसाठी वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालय व इतर शैक्षणिक प्रयोजनांसाठी इमारत बांधण्याचे प्रस्तावित केले आहे.

८४. राज्यातील इयत्ता सातवी ते बारावी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी, व्यावसायिक शिक्षणाची एक नवीन केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. त्याद्वारे या विद्यार्थ्यांना शिकत असतानाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, जेणेकरून विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाणही कमी होईल.

८५. शासनाने, शिशुवर्गाच्या आणि इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठीचे किमान वय हे अनुक्रमे तीन वर्षे आणि सहा वर्षे करण्याचे ठरविले असून या निर्णयाची अंमलबजावणी अनुक्रमे २०१६-२०१७ आणि २०१९-२०२० या वर्षांपासून करण्यात येईल.

८६. विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्यासाठी मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्याच्या दहा मिनिटे अगोदर विद्यार्थ्यांना वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

८७. शासनाने, भारत सरकारच्या सहाय्याने, नागपूर व पुणे येथे भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था तसेच नागपूर येथे भारतीय व्यवस्थापन संस्था स्थापन करण्याचे योजिले आहे.

८८. मुंबई येथे राष्ट्रीय विधि विद्यापीठाची स्थापना करण्याचे अधिसूचित केले असून कुलगुरूंची नियुक्तीदेखील करण्यात आली आहे. शासनाने, औरंगाबाद व नागपूर येथेही राष्ट्रीय विधि विद्यापीठ स्थापन करण्याचे ठरविले आहे.

८९. अंगणवाडी आणि अंगणवाडी लाभार्थींच्या कुटुंबाकडे उपलब्ध असलेल्या जमिनीवर टप्प्याटप्प्याने परसबाग योजना राबविण्याचा शासनाचा मानस असून या योजनेअंतर्गत भाजीपाला व फळे पिकविण्यात येणार आहेत. त्यामुळे लाभार्थींना सकस आहार मिळेल.

९०. एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत तात्पुरत्या जागेत भरविण्यात येणाऱ्या ४६,४६३ इतक्या अंगणवाड्यांकरिता पुढील तीन वर्षांमध्ये नवीन इमारती बांधण्याचा एक विशाल प्रकल्प सुरू करण्याचे योजिले असून या अंगणवाड्यांचे बांधकाम लवकरात लवकर व कमी खर्चात होण्यासाठी प्री-फेब्रिकेटेड तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल.

९१. भारत सरकारने " बेटी बचाओ-बेटी पढाओ " ही योजना संपूर्ण देशात राबविण्याची २६ जानेवारी २०१५ रोजी घोषणा केली असून या योजनेच्या धर्तीवरच, राज्य शासनाने " माझी कन्या भाग्यश्री " ही नवीन योजना सुरू करण्याचे ठरविले आहे.

९२. अनुसूचित जाती आणि इतर प्रवर्गांतील जात प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी सध्या १५ जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत असून सदर प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या कामात सुसूत्रता यावी व लाभार्थ्यांना तात्काळ जात प्रमाणपत्रे मिळावीत याकरिता राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अशा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

९३. भारत सरकारच्या योजनेनुसार, शिक्षकांसाठी पायाभूत सुविधा व प्रगत तंत्रज्ञान पुरवण्यात येईल. कोणतेही बालक शिक्षणाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही याकरिता ठोस उपाययोजना करण्यात येतील.

९४. अल्पसंख्याक विद्यार्थिनींसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृहे सुरू करण्यात येत आहेत. आतापर्यंत १० इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यास आवश्यक पायाभूत सुविधा पुरविण्याची कार्यवाही सुरू आहे.

९५. शासनाने पालघर जिल्ह्यात आदिवासी युवकांकरिता एकलव्य क्रीडा व उद्योजकता प्रबोधिनी स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे. ही क्रीडा प्रबोधिनी स्थापन होईपर्यंत नाशिक क्रीडा प्रबोधिनी येथे जून २०१५ पासून आदिवासी युवकांना प्रशिक्षण देण्यात येईल.

९६. मोठ्या प्रमाणात होणारे बालमृत्यू आणि कुपोषण या गंभीर समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी " आदिवासी आरोग्य व पोषण आहार अभियान " सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे.

९७. बालकांचा मोफत शिक्षणाचा हक्क अधिनियमाच्या तरतुदींनुसार, शासकीय आश्रमशाळांमधील शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना करून, सदर समितीस शासकीय आश्रमशाळांच्या एक लाख रूपये इतक्या किरकोळ दुरूस्तीचे अधिकार दिले जातील.

९८. मला हे सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, राज्य शासनाने यावर्षी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याच्या वेळी सादर केलेल्या " पंढरीची वारी " या स्थिरनाट्य देखाव्यास भारत सरकारचा सर्वोत्कृष्ट स्थिरनाट्य देखावा म्हणून पुरस्कार मिळाला आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व कलाकारांचे, तंत्रज्ञांचे, सहायकांचे व अधिकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो.

९९. आगामी वर्षातील महाराष्ट्र पर्यटनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा एक भाग म्हणून, सर्व हंगामातील पर्यटनस्थळ तसेच गुंतवणुकीचे सर्वोत्कृष्ट स्थान म्हणून राज्याला चालना देण्याचा शासन विचार करीत आहे.

१००. भारत सरकारने देशातील पर्यटनास उत्तेजन देण्यासाठी १४३ देशांसाठी " इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन " कार्यक्रमाची अलिकडेच घोषणा केली आहे. या नवीन कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी, माझे शासन सप्टेंबर २०१५ मध्ये मुंबईत पहिला महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रॅव्हल मार्ट आयोजित करीत आहे.

१०१. सन्माननीय सदस्यहो, या अधिवेशनात पूरक मागण्या, २०१५-१६ या वर्षाचा अर्थसंकल्प, लेखानुदान, विधेयके आणि इतर शासकीय व अशासकीय कामकाज आपल्यापुढे विचारार्थ मांडण्यात येईल.

या अधिवेशनातील आपल्या सर्व विचारविमर्शास मी सुयश चिंतितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**